नियमित दिवाणी दावा क्र. २०/२०१४
सुरेंद्र वि. सुनंदा
CNR No. MHSI080001322014

निशाणी क्र.२०१ वर आदेश

०१. प्रतिवादी क्र.२६/१ ते २६/३ यांनी सदरचा अर्ज दाखल केला आहे. वादीतर्फे म्हणणे चे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी यांचेतर्फे विद्वान वकील यांचे युक्तीवाद ऐकले.

०२. प्रस्तुत अर्जात प्रतिवादी यांनी असे कथन केले आहे की, सदर प्रतिवादी यांनी या कामी काही कागद हजर केले असून सरतपासाचे शपथपत्रात नमूद करुन सिध्द केले आहेत. या कामी प्रतिवादीने दावा मिळकतीत असलेली झाडे कणकवली येथीन वन अधिका–यांची आवश्यक ती परवानगी घेऊन तोडली आहेत. ती परवानगी प्रतिवादी क्र.२६ यांनी त्यांचे हिस्सेदाराने त्याला दिलेल्या मुखत्यार पत्राच्या आधारे मिळवली होती व आहे. सदर परवानगीचा नंबर रेंज वृक्षतोड प्र.क्र.२७०/२०१३/१४ कणकवली दि.१/१०/२०१३ होता व आहे. सदर परवानगीची झेरॉक्स प्रत प्रतिवादी यांनी या प्रकरणात सामील केली आहे. तसेच या प्रकरणामध्ये वृक्ष अधिकारी कणकवली यांनी समन्स प्रमाणे सदर झाड तोडीच्या मुळ प्रकरणातील सर्व कागदपत्रे हजर केले आहेत. त्यापैकी अ.क्र.९/नऊला रत्नोजीराव राणे वगैरे सहा यांनी रमेश विष्णूराव राणे यांना दिलेले कुलमुखत्यार पत्र याची झेरॉक्स सादर केली आहे. सदर मुळ मुखत्यार पत्राची मुळ प्रत रमेश रावराणे यांचेकडे होती. ती रमेश रावराणे यांच्या घरी शोध घेऊन सुध्दा सापडून आली नाही. ती झेरॉक्स प्रत मुळ प्रतिप्रमाणे झेरॉक्स बनवण्यात आली आहे. तसेच वर नमुद आणि प्रतिवादी यांच्या सरतपासात नमुद असलेली वृक्षतोड परवानगीची मुळ प्रत रमेश रावराणे यांनी वृक्ष अधिकारी यांच्याकडे जमा केली आहे. सदर दोन्ही कागद पुराव्यामध्ये वाचण्यात येण्याकरीता प्रतिवादी यांना सदर दोन्ही प्रतींना निशाणी देऊन त्या प्रति पुराव्यात वाचण्यात याव्यात अगर त्या दोन्ही झेरॉक्स कागदपत्रांबाबत प्रतिवादी

यांना दुय्यम पुरावा देण्याची परवानगी देण्यात यावी अशी विनंती केली आहे.

०३. वादी यांनी सदर अर्जावर आपले म्हणणे नि.क्र.२०३ वर सादर करुन अर्जास प्रखर विरोध दर्शवला आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, प्रतिवादीचा अर्ज कायद्याने चालण्याजोगा नाही. प्रतिवादींनी कायद्याच्या कोणत्या तरतुदीखाली अर्ज दिला आहे त्याचा उल्लेख अर्जामध्ये केला नाही. अर्जात नमुद केलेल्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रतींना निशाण देता येणार नाही अगर सदर झेरॉक्स प्रतींबाबत दुयय्म पुराव देखील देण्याची तरतुद कायद्यात नाही. अर्जातील कलम ४ व ५ मधील कथन खोडसाळ असून वादींना कबूल नाही. मुळ मुखत्यारपत्र गहाळ झाले हे प्रतिवादींचे खोटे कथन आहे. अर्जात नमुद केलेले मुखत्यारपत्र व वृक्षतोड परवानगी हे दोन्ही कागद वादींना कबुल नाहीत. दुय्यम पुरावा देण्यासंदर्भात भारतीय पुराव्याच्या कायद्यामध्ये स्पष्ट तरतुदी दिलेल्या असून त्या तरतुदींचे अवलोकन करता प्रतिवादींचा अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. सबब, अर्जातील नमुद कागदपत्रांना निशाणी देण्यात येऊ नये. तसेच पटलावरील छायांकित प्रतीसंदर्भात दुय्यम पुरावा देण्यासाठी दिलेला परवानगी अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा.

०४. रमेश विष्णू रावराणे यांनी करुन दिलेल्या कुलमुखत्यारपत्राचे अवलोकन केले असता असे दिसते की, सदर झेरॉक्स प्रत आहे. या ठिकाणी हे नमुद करणे आवश्यक आहे की, झेरॉक्सप्रत पुराव्यात अग्राह्य (Inadmissible) आहे. त्यामुळे, सदर दस्तऐवजास निशाणी क्रमांक देता येणार नाही. तसेच त्याबाबत दुय्यम पुरावा देखील देता येणार नाही.

०५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसते की, वृक्ष अधिकारी कणकवली यांनी यादी नि.क्र.१८९ प्रमाणे दाखल केलेल्या कागदपत्रांपैकी अनु.क्र.1 ते ५, १४ व १६ ते २२ यांना एकत्रीत रीत्या यापुर्वीच नि.क्र.१९५ देण्यात आलेले आहे व त्यातील पान क्र. १५

याला नि.क्र.१९६ देण्यात आलेले आहे. नि.क्र १९५ यासोबतच वृक्षतोडीची परवानगी याला देखील निशाणी क्रमांक देण्यात आले आहे. सदर परवानगीची झेरॉक्स प्रत वस्तु–अ प्रमाणे दाखल आहे. त्यामुळे, परवानगीची झेरॉक्स प्रत वस्तु–अ ला पुन्हा निशाणी क्रमांक देण्याची कोणतीही आवश्यकता नाही.

०६. वरील कारणमिमांसेचा सारांश असा आहे की, नि.क्र.२०१ नामंजूर होण्यास पात्र आहे. सबब मी खालील आदेश पारीत करीत आहे –

**आदेश**

१. अर्ज निशाणी क्र.२०१ नामंजुर करण्यात येतो.

SHAIEKH TAJJUM SHAIEKH HAMID
Digitally signed by SHAIEKH TAJJUM SHAIEKH HAMID
Date: 2025.01.09 10:34:11 +0530

(टी.एच. शेख)

दिनांकः ०८/०१/२०२५

न्यायाधिकारी, ग्रामन्यायालय,
वैभववाडी